5) इतर राज्यातून/मंडळातून आलेले जे विद्यार्थी इ. 12 वी मध्ये प्रवेश घेतात त्यांचे योग्यता प्रमाणपत्राचे अर्ज दिनांक 15 सप्टेंबर पूर्वी मंडळाकडे सादर करणे आवश्यक आहे. तसेच विषयाचे संयुक्तीकरण चुकीचे (Wrong Subject Combination ) होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी. तसेच Computer Science किंवा प्रात्यक्षिकचे विषय सोडून प्रवेश देण्यात यावा.

6) योग्यता प्रमाणपत्रासाठी विद्यार्थ्यांकडून घ्यावयाचे नियमित शुल्क ( इ. 11 वी / 12 वी )

1) महाराष्ट्राबाहेरील राज्यातून येणा-या विद्यार्थ्यासाठी प्रत्येकी रूपये **300/–**

2) परदेशातून येणा-या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येकी रूपये **500/–**

7) कनिष्ठ महाविद्यालयाने विद्यार्थ्याचे योग्यता प्रमाणपत्राचे अर्ज नियमित/विलंब/अतिविलंब शुल्कासह मंडळाकडे सादर करावयाच्या तारखा खालील प्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

| | | |
|---|---|---|
| अ) | नियमित शुल्कासह अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख | 16 ऑगस्ट व 15 सप्टेंबर 2018 |
| ब) | विलंब शुल्क रूपये 100/– प्रती विद्यार्थी | 16 सप्टेंबर ते 15 नोव्हेंबर 2018 |
| क) | अति विलंब शुल्क रूपये 10/– प्रतीदिन प्रती विद्यार्थी व संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाकडून प्रती विद्यार्थी रूपये 1000/– दंड वसूल करण्यात येईल. | 16 नोव्हेंबर पासून कागदपत्राच्या त्रुटींची पूर्तता करेपर्यंत |

8) दिनांक 16 नोव्हेंबर पासून सर्वसाधारणपणे अर्ज स्वीकारण्यात येणार नाही, परंतु प्रत्येक विद्यार्थ्याची अशी वैयक्तिक प्रकरणीका पाहून अशा विद्यार्थ्यांचे अर्ज स्विकारावयाचे किंवा नाही या संबंधीचे अधिकार विभागीय अध्यक्ष यांना राहतील, हे अर्ज स्विकारतांना प्रत्येक विद्यार्थ्यांकडून विलंब शुल्क रूपये 100/– अतिविलंब शुल्क रूपये 10/– प्रती दिन याप्रमाणे शुल्क घेण्यात यावे तसेच प्रती विद्यार्थी रूपये 1000/– दंडाची रक्कम कनिष्ठ महाविद्यालयाने भरावयाची आहे.

9) अंतिम योग्यता प्रमाणपत्रासाठी आवश्यक त्या उर्वरित कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी (इ.11वी व 12वी) **20 जानेवारी 2019** ही अंतिम मुदत असेल. मात्र त्यानंतर खालील "ब" प्रमाणे अतिविलंब शुल्क आकारण्यात येईल.

अ) उर्वरित आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी : अंतिम तारीख 20 जानेवारी 2019 (इ.11 वी/12वी)

ब) विलंब शुल्क प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी रूपये 5/– प्रतीदिन : 21 जानेवारी ते 30 ऑगस्ट 2019 तसेच संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाकडून प्रती विद्यार्थी रूपये 100/– दंड वसुल करण्यात येईल. दि. 30 ऑगस्ट–2019 पर्यंत उर्वरित प्रमाणपत्राची पूर्तता न केल्यास संबंधित विद्यार्थ्याचा प्रवेश व संपादणूक / निकाल रद्द करण्यात येईल, याची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्यांची राहील.

10) योग्यता प्रमाणपत्रासाठी पात्र नाही अशा विद्यार्थ्यांना अंतिम योग्यता प्रमाणपत्र दिले जाणार नाही अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश त्वरीत रद्द करण्यात यावेत. कोणत्याही परिस्थितीत त्यांची इ. 12 वी परिक्षेची